जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

18 JUN 2026 तरुण भारत

लक्षवेधी डॉ. ज्योती जाधव : इंग्रजी चरित्रग्रंथांचे शिवाजी विद्यापीठात प्रकाशन

# अहिल्यादेवींची संघर्षगाथा दिशादर्शक

। त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जाज्वल्य कार्यकर्तृत्वासह त्यांच्या संघर्षाची गाथाही समाजासमोर यायला हवी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात लेखक रामभाऊ लांडे लिखित 'लाइफ अँन्ड वर्क ऑफ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' या इंग्रजी चरित्र पुस्तकाच्या प्रकाशनावेळी त्या बोलत होत्या. यावेळी मल्हार सेनेचे बबनराव रानगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. जाधव म्हणाल्या, अहिल्यादेवी होळकर यांनी विविध समस्यांवर मात करत वाटचाल केली व त्यातून उत्तुंग कार्याची उभारणी केली. त्यांच्या कार्याचा संघर्ष आणि त्याग जनतेसमोर यायला हवा. अहिल्यादेवींचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी आधुनिक माध्यमांचा प्रभावी वापर करण्याची आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली.

इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील म्हणाले, अहिल्यादेवींविषयीचे पुस्तक इंग्रजीतून साकार होणे, महत्त्वाचे आहे. उपलब्ध सर्व साधनांचा आधार घेऊन अहिल्यादेवींच्या कार्यकर्तृत्वाचे विविध पैलू उलगडले आहेत. धार्मिकतेच्या पलिकडेही लोककल्याणकारी भूमिकेतून अहिल्यादेवींनी केलेल्या कार्याचा या पुस्तकातून समोर आला आहे.

डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी स्वागत केले. डॉ. दत्तात्रय घुटुगडे यांनी आभार मानले. यावेळी तेजस प्रकाशनचे रावसाहेब पुजारी, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. दत्तात्रय मचाले, अशोक परीट, डॉ. चांगदेव बंडगर, नारायण मोटे–देसाई, प्रताप चिपळूणकर, यश आंबोळे, अजय गोदे, अजय पुजारी, वैभव जानकर, संतोष कोळेकर आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : अहिल्यादेवी होळकर यांच्या इंग्रजी चरित्रग्रंथाच्या प्रकाशन प्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, बबनराव रानगे, रामभाऊ लांडे, रावसाहेब पुजारी, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. अवनीश पाटील आदी.**

1 8 JUN 2026

वर्तमान

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अहिल्यादेवींची संघर्षगाथाही समाजासमोर यावी : डॉ. ज्योती जाधव



**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जाज्वल्य कार्यकर्तृत्वाबरोबरच त्यासाठी त्यांनी सोसलेल्या संघर्षाची गाथाही समाजासमोर यायला हवी, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केली.

विद्यापीठात आज प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते रामभाऊ लांडे लिखित 'लाइफ अँन्ड वर्क ऑफ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' या इंग्रजी चरित्र पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. मल्हार सेनेचे बबनराव रानगे प्रमुख उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, अहिल्यादेवी होळकर यांनी वडिल आणि सासरे यांच्या कणखर पाठिंब्याने आपल्या कार्याची सुरवात केली असली तरी एक महिला म्हणून त्यांना अनेक अडचणींतून जावे लागले. अनेक समस्यांवर मात करीत त्यांनी आपली वाटचाल केली आणि त्यातून उत्तुंग कार्याची उभारणी केली. ते कार्य महत्त्वाचे आहेच, मात्र त्यामागील संघर्ष आणि त्यागही जनतेसमोर यायला हवा. त्या दृष्टीने अभ्यासक आणि संशोधकांनी संदर्भांचा धांडोळा घेतलापाहिजे. अहिल्यादेवींचेकार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी आधुनिक माध्यमांचा प्रभावी वापर करण्याची आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी पुस्तकावर भाष्य केले. ते म्हणाले, रामभाऊ लांडे हे केवळ लेखक नाहीत, तर होळकरशाहीचे संशोधक आहेत. त्यामुळे त्यांच्या हातून अहिल्यादेवींविषयीचे पुस्तक इंग्रजीतून साकार होणे, महत्त्वाचे आहे. उपलब्ध सर्व साधनांचा आधार घेऊन त्यांनी अहिल्यादेवींच्या कार्यकर्तृत्वाचे विविध पैलू उलगडले आहेत. धार्मिकतेच्या पलिकडेही अत्यंत वेगळ्या लोककल्याणकारी भूमिकेतून अहिल्यादेवींनी कार्य केले. त्यांनी केलेला दानधर्म हा त्यांनी राज्याच्या दौलतीमधून नव्हे, तर त्यांच्या खासगी निधीमधून केला, हा फार महत्त्वाचा संदर्भ या पुस्तकातून सामोरा आला आहे. तो अमूल्य स्वरुपाचा आहे. यावरुन एक राज्यकर्ता म्हणून त्यांचे मोठेपण अधोरेखित होते.

यावेळी लेखक श्री. लांडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. दत्तात्रय घुटुगडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला तेजस प्रकाशनचे रावसाहेब पुजारी, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. दत्तात्रय मचाले, अशोक परीट, डॉ. चांगदेव बंडगर, नारायण मोटे-देसाई, प्रताप चिपळूणकर, यश आंबोळे, अजय गोदे, अजय पुजारी, वैभव जानकर, संतोष कोळेकर आदी उपस्थित होते.

# अहिल्यादेवींची संघर्षगाथाही समाजासमोर यावी : डॉ.ज्योती जाधव

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जाज्वल्य कार्यकर्तृत्वाबरोबरच त्यासाठी त्यांनी सोसलेल्या संघर्षाची गाथाही समाजासमोर यायला हवी, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केली.

विद्यापीठात आज प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांच्या हस्ते रामभाऊ लांडे लिखित 'लाइफ अँन्ड वर्क ऑफ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' या इंग्रजी चरित्र पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. मल्हार सेनेचे बबनराव रानगे प्रमुख उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, अहिल्यादेवी होळकर यांनी वडिल आणि सासरे यांच्या कणखर पाठिंब्याने आपल्या कार्याची सुरवात केली असली तरी एक महिला म्हणून त्यांना अनेक अडचणींतून जावे लागले. अनेक समस्यांवर मात करीत त्यांनी आपली वाटचाल केली आणि त्यातून उत्तुंग कार्याची उभारणी केली. ते कार्य महत्त्वाचे आहेच, मात्र त्यामागील संघर्ष आणि त्यागही जनतेसमोर यायला हवा. त्या दृष्टीने अभ्यासक आणि संशोधकांनी संदर्भांचा धांडोळा घेतला पाहिजे. अहिल्यादेवींचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी आधुनिक माध्यमांचा प्रभावी वापर करण्याची आवश्यकताही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी पुस्तकावर भाष्य केले. ते म्हणाले,



रामभाऊ लांडे हे केवळ लेखक नाहीत, तर होळकरशाहीचे संशोधक आहेत. त्यामुळे त्यांच्या हातून अहिल्यादेवींविषयीचे पुस्तक इंग्रजीतून साकार होणे, महत्त्वाचे आहे. उपलब्ध सर्व साधनांचा आधार घेऊन त्यांनी अहिल्यादेवींच्या कार्यकर्तृत्वाचे विविध पैलू उलगडले आहेत. धार्मिकतेच्या पलिकडेही अत्यंत वेगळ्या लोककल्याणकारी भूमिकेतून अहिल्यादेवींनी कार्य केले. त्यांनी केलेला दानधर्म हा त्यांनी राज्याच्या दौलतीमधून नव्हे, तर त्यांच्या खासगी निधीमधून केला, हा फार महत्त्वाचा संदर्भ या पुस्तकातून सामोरा आला आहे. तो अमूल्य स्वरुपाचा आहे. यावरुन एक राज्यकर्ता म्हणून त्यांचे मोठेपण अधोरेखित होते.

यावेळी लेखक श्री. लांडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. दत्तात्रय घुटुगडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला तेजस प्रकाशनचे रावसाहेब पुजारी, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. दत्तात्रय मचाले, अशोक परीट, डॉ. चांगदेव बंडगर, नारायण मोटे-देसाई, प्रताप चिपळूणकर, यश आंबोळे, अजय गोदे, अजय पुजारी, वैभव जानकर, संतोष कोळेकर आदी उपस्थित होते.

18 JUN 2026
सकाळ

# 'व्होकेशनल स्किल कोर्स'चा दीड हजार विद्यार्थ्यांना दिलासा

## परीक्षा मंडळाकडून पुन्हा संधी; २१ जूनपर्यंत नोंदणीची मुदत

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाने व्हॅल्यू एज्युकेशन कोर्स (व्हीईसी) विषयात अनुत्तीर्ण झालेल्या दीड हजार विद्यार्थ्यांना दिलासा देत नोंदणी व असाइनमेंट पूर्ण करण्यासाठी विशेष संधी दिली आहे.

मार्च-एप्रिलमध्ये झालेल्या परीक्षेत व्हॅल्यू एज्युकेशन कोर्स या विषयात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विविध अकरा महाविद्यालयांतील सुमारे दीड हजार विद्यार्थी आवश्यक नोंदणी न करणे, असाइनमेंट पूर्ण न करणे अथवा अंतर्गत परीक्षेस गैरहजर राहणे यामुळे अनुत्तीर्ण झाले आहेत.

एनईपीनुसार बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी सत्र दोनमध्ये व्हीईसी कोर्स विद्यार्थ्यांनी पूर्ण करणे अनिवार्य आहे. विद्यापीठाच्या धोरणानुसार संबंधित कोर्स पाचगणीतील बहाई अकॅडमीतर्फे घेतला जातो. काही महाविद्यालयांच्या समन्वयकांकडून अनावधानाने या



कोर्सच्या परीक्षेची लिंक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली नाही. त्यामुळे त्यांना परीक्षा देता आली नाही. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये. त्यांना पुन्हा परीक्षा देण्याची संधी द्यावी, अशी मागणी व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. स्वागत परुळेकर यांनी ११ जूनला पत्राद्वारे विद्यापीठाकडे केली होती. यावर मंगळवारी (ता. १६) विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने बैठक घेतली. त्यात विद्यार्थ्यांना पुन्हा संधी देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. त्यात २१ जूनपर्यंत नोंदणी व असाइनमेंट पूर्ण करण्याची मुदत दिली आहे.

18 JUN 2026

ग्लोबल टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या १९ विद्यार्थ्यांचे विविध स्पर्धा परीक्षांत यश

कोल्हापूर : शिवाजी विदयापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामधील १९ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोक सेवा आयोगासह सरळसेवा भरतीच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांत भरीव यश प्राप्त केले आहे. पोलीस उपनिरीक्षक पदापासून ते आरोग्य सेवकापर्यंतची पदे या विद्यार्थ्यांनी मिळविली आहेत. यातील काही जणांची तर तीन-तीन पदांवर निवड झाली आहे. ही माहिती केंद्राच्या समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी दिली.



महाराष्ट्र लोक सेवा आयोगासह विविध स्पर्धा परीक्षांत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. धनाजी शेळके (एमपीएससी, पोलीस उपनिरीक्षक), महेश साळुंखे (एमपीएससी, पोलीस उपनिरीक्षक), अतुल मानकर (एमपीएससी राज्य कर निरीक्षक), सुहेल मुल्ला (एमपीएससी कर सहाय्यक), कल्पक चिले, (एमपीएससी कर सहाय्यक), सुरज कांबळे, (तीन पदे- १. महसूल सहाय्यक, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली, कालवा निरीक्षक, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, ३. आरोग्य सेवक, आरोग्य विभाग), पंकज पाटील (तीन पदे- १. ज्युनिअर असिस्टंट, जिल्हा परिषद, पुणे २. वरिष्ठ सुरक्षा सहाय्यक, आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन ३. आरोग्य सेवक, जिल्हा परिषद, सातारा), दिनेश साबळे (चार पदे- १ सिव्हील इंजिनियर असिस्टंट, जलसंपदा विभाग, सातारा, २. नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका ३. सिव्हील इंजिनियर असिस्टंट, पाटबंधारे विभाग ४. ज्युनियर इंजिनियर, जिल्हा परिषद, कोल्हापूर), कुणाल दैव (तलाठी, सांगली), सुनिल कांबळे, (दोन पदे- १. कालवा निरीक्षक, जलसंपदा विभाग, २. पवित्र पोर्टल, शिक्षक), प्राजक्ता पाटील (मोजणीदार, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन), रोहित पाटील (रेल्वे बोर्ड, ट्रॅक मेन्टेनर), पंकज खंबाईत (तलाठी, नाशिक), शिवराज पाटील (कार्यकारी सहाय्यक, मुंबई महानगरपालिका), ऑकार रणदिवे (फायर ब्रिगेड, मुंबई महानगरपालिका), नितीन वळवी, (लॅब अटेंडन्ट, गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज), राकेश लोहार, (लॅब अटेंडन्ट, गव्हर्मेंट मेडिकल कॉलेज), अनिल टेंगले, (आरोग्य सेवक, आरोग्य विभाग), संदेश साठे (पवित्र पोर्टल, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद, सातारा).

या सर्व यशस्वी विदयार्थ्यांना शिवाजी विदयापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी अभिनंदन केले असून पुढील वाटचालीला शुभेच्छा दिल्या आहेत.

18 JUN 2026

पुण्यनगरी

# अहिल्यादेवींची संघर्षगाथा समाजासमोर यावी : डॉ. जाधव

**कोल्हापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जाज्वल्य कार्यकर्तृत्वाबरोबरच त्यासाठी त्यांनी सोसलेल्या संघर्षाची गाथाही समाजासमोर यायला हवी, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केली.

विद्यापीठात त्यांच्या हस्ते रामभाऊ लांडे लिखित 'लाईफ अँड वर्क ऑफ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' या इंग्रजी चरित्र पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. मल्हार सेनेचे बबनराव रानगे प्रमुख उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, अहिल्यादेवी होळकर यांनी अनेक अडचणींवर मात करत आपली वाटचाल केली आणि त्यातून उत्तुंग कार्याची उभारणी केली.

यावेळी डॉ. अवनिश पाटील, लेखक लांडे यांनीही आपले मत व्यक्त केले. डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. दत्तात्रय घुटुगडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला तेजस प्रकाशनचे रावसाहेब पुजारी, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. दत्तात्रय मचाले, अशोक परीट, डॉ. चांगदेव बंडगर, नारायण मोटे-देसाई, अजय पुजारी, वैभव जानकर, संतोष कोळेकर आदी उपस्थित होते.

1 8 JUN 2026

सिंधुदुर्ग समाचार

# गवताळ क्षेत्रातील जैवविविधता अभ्यासण्यासाठी विद्यापीठाला संशोधन प्रकल्प मंजूर

कोल्हापूर/प्रतिनिधी :

पश्चिम महाराष्ट्रातील गवताळ प्रदेशातील जैववविविधतेचा अभ्यास करण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील संशोधकांना महत्त्वपूर्ण संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे. महाराष्ट्र जीन बँक आणि महाराष्ट्र राज्याचे महाराष्ट्र जैवविविधता मंडळ यांच्याकडून या सुमारे ३३ लाख रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी प्राप्त झाली आहे.

महाराष्ट्र जीन बँक आणि महाराष्ट्र जैवविविधता मंडळाकडून 'पश्चिम महाराष्ट्रातील दोन गवताळ प्रदेश आणि सॅव्हाना अधिवासांमधील गवत, वृक्ष, पृष्ठवंशीय प्राणी आणि निवडक संधिपाद (आर्थ्रोपॉड) गटांची विविधता (डायव्हर्सिटी ऑफ ग्रासेस, ट्रीज, वर्टिब्रेट्स अँड सिलेक्टेड आर्थ्रोपॉड्स इन टू ग्रासलॅंड्स अँन्ड सॅव्हाना हॅबिटॅट्स इन वेस्टर्न महाराष्ट्र) या संशोधन प्रकल्पासाठी मंजुरी आणि आर्थिक सहाय्य प्राप्त झाले आहे. एकूण ३३,१७,०००/- इतक्या मूल्याचा हा प्रकल्प विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. सुनील गायकवाड यांना मंजूर झाला आहे. डॉ. गायकवाड हे प्रकल्प प्रमुख म्हणून आणि वनस्पतीशास्त्र अधिविभागातील डॉ. मनोज लेखक हे सह-प्रकल्प प्रमुख म्हणून काम पाहणार आहेत.

अत्यंत समाजाभिमुख असलेल्या या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट कोल्हापूर जिल्ह्यातील मसाई पठार, आणि सांगली जिल्ह्यातील दंडोबा हिल्स या दोन गवताळ क्षेत्रांतील जैवविविधता तपासणे आणि तेथील परिसरात असणाऱ्या शैक्षणिक संस्था व स्थानिक रहिवाशी यांना त्याची माहिती देऊन या भागांतील जैवविविधता जपण्यासाठी प्रबोधन करणे हा आहे. तसेच, या दोन्ही क्षेत्रांत राहणाऱ्या युवकांना जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन याचे ज्ञान देऊन, या क्षेत्रांना भेटी देणाऱ्या पर्यटकांना स्थानिक गाईड म्हणून जैवविविधतेची माहिती देण्याचे प्रशिक्षणही दिले जाणार आहे.

1 8 JUN 2026
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या ७१८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेतील मंगळवारी १२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर ७१८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर झाले आहेत. मंगळवारी विविध ४२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ७७ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून सदर परीक्षेसाठी ३५३८ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून मंगळवारी कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद करण्यात आली नाही. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक केले आहे.

1 8 JUN 2026
तरुण भारत

# पदवी, पदव्युत्तरच्या परीक्षेत ५ गैरप्रकार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर परीक्षेत बुधवारी कोल्हापूर ३ व सातारा जिल्ह्यातून २ अशा एकूण ५ गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे. बुधवारी २० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. आजअखेर ७३८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. मंगळवारी विविध ३९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ७८ परीक्षा केंद्रावर पार पडल्या असून या परीक्षांसाठी ४६०४ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनांप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

18 JUN 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठामध्ये महाराणा प्रतापसिंह जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. कबीर खराडे, सहा. प्राध्यापक यशोधन बोकील, अनिल साळोखे, जांबवंत शेळके, चंद्रकांत कांबळे, दीपा साबळे आदी उपस्थित होते.

18 JUN 2026

लोकमत

# बीएड-एमएड, एमएड कॅप; प्रवेश नोंदणी सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी बीएड-एमएड (३ वर्षीय एकात्मिक अभ्यासक्रम) आणि मास्टर ऑफ एज्युकेशन (या दोन अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेशाच्या) अभ्यासक्रमाच्या नोंदणीला १६ जूनपासून सुरुवात केली आहे. या दोन्ही अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना ६ जुलैपर्यंत नोंदणी करता येणार आहे.

यंदा बीएड-एमएड या अभ्यासक्रमाची सीईटी ९ एप्रिलला घेण्यात आली होती. ही सीईटी ७९७ विद्यार्थ्यांनी दिली आहे. तसेच एमएड या अभ्यासक्रमाची सीईटी २५ मार्चला घेतली होती. ही सीईटी ३४५१ विद्यार्थ्यांनी दिली आहे. या दोन्ही अभ्यासक्रमाच्या सीईटीचे निकाल १९ मे रोजी जाहीर केले आहेत.

विद्यार्थ्यांनी मार्च-एप्रिल २०२६ मध्ये पार पडलेल्या बीएड-एमएड व एमएड या अभ्यासक्रमाची सीईटी दिलेली आहे, त्या विद्यार्थ्यांनी केंद्रिभूत प्रवेशासाठी नोंदणी करावी. अद्ययावत माहितीसाठी विद्यार्थ्यांनी सीईटी कक्षाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन सीईटी कक्षाने केले आहे.